# इचलकरंजी महानगरपालिका

## मा.आयुक्तसो इचलकरंजी महानगरपालिका

## सन २०२२-२३ चे सुधारित व २०२३-२४ चे मूळ वार्षिक अंदाजपत्रकाचे विवेचन

आजच्या या अर्थसंकल्पीय बैठकीत मी, प्रशासक तथा आयुक्त, इचलकरंजी महानगरपालिका सभागृहात उपस्थित पत्रकार व सर्व अधिकारी, कर्मचारी यांचे स्वागत करतो. कोल्हापूर जिल्हयातील इचलकरंजी नगरपरिषदेचे संपुर्ण क्षेत्र एक मोठे नागरी क्षेत्र असल्याने शासनाने दि.२९ जून २०२२ रोजी अधिसुचनेद्वारे इचलकरंजी नगरपरिषदेचे "इचलकरंजी शहर महानगरपालिका" मध्ये रुपांतर केलेले आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९५ नुसार सन २०२२-२०२३ आर्थिक वर्षाचे सुधारीत व सन २०२३-२०२४ या वर्षाचे मुळ अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक, इचलकरंजी महानगरपालिकेचे स्थापनेनंतरचे पहिले अंदाजपत्रक आपल्या समोर सादर करताना मला आनंद होत आहे.

**<u>इचलकरंजी शहराची पार्श्वभुमी</u>**

इचलकरंजी शहर हे औद्योगिक शहर असून शहराची आजची लोकसंख्या अंदाजे ३.५ लाखा पेक्षा जास्त आहे. शहरामध्ये आसपासच्या खेडयातील कामगार वर्ग शहरात रोजगार निमित्त ये-जा करतो. त्यामुळे इचलकरंजी महानगरपालिका जवळपास ४.० लाख लोकांना नागरी सुविधा पुरविते. शहराचे क्षेत्रफळ २९.८४ चौ. किलोमीटर आहे. घोरपडे सरकार हे इचलकरंजी संस्थानचे संस्थापक आहेत. घोरपडे संस्थानिक यांनी प्रयत्न करुन १९०४ साली इचलकरंजी शहरात पहिला यंत्रमाग सुरु करुन शहरातील वस्त्रोद्योगाची मुहूर्तमेढ रोवली. सद्या इचलकरंजी शहर हे देशातील वस्त्रोद्योगाचे मोठे केंद्र असून शहरात देशातील व परदेशातील नामांकित कंपन्यांना लागणारे कापड निर्मिती केली जाते.

इचलकरंजी महानगरपालिकेमार्फत दि. ४ नोव्हेबर, २०२२ रोजी शहराची ओळख व सामाजिक बांधिलकी यांची ओळख करून देणारे नविन बोधचिन्ह तयार करुन महानगरपालिकेच्या सर्व पत्रव्यवहार व करारांवर तसेच अन्य आवश्यक ठिकाणी त्याचा वापर सुरु केला आहे.

**<u>सन २०२२-२३ सालाचा अर्थसंकल्प व त्याची पुर्तता</u>**

तत्कालीन इचलकरंजी नगरपरिषदेचे लेखासंहिता २०१३ नुसार सन २०२१-२२ ची सुधारित व २०२२-२३ चे मूळ अंदाजपत्रक तयार करण्यात आले होते. महानगरपालिकेची स्थापना झाल्यानंतर नगरपरिषदेचे तयार करण्यात आलेले अंदाजपत्रक स्वीकारून त्यात महानगरपालिका कामकाजा नुसार अंशतः बदल व आवश्यक सुधारणा करून सदरचे अंदाजपत्रक अंमलबजावणीसाठी वापरण्यात आले.

| लेखा सांकेतांक | | बाबीचे नांव जमेचे | सुधारित अंदाजपत्रक सन २०२२-२३ | अंदाजपत्रक सन २०२३-२४ |
|---|---|---|---|---|
| | | प्रारंभिक शिल्लक | 1933975788.05 | 1832003577.65 |
| ११०० | क) | कर महसुल | 344020000.00 | 352361000.00 |
| १२०० | ख) | अभिहस्तांकित महसुल आणि भरपाई | 13500000.00 | 13500000.00 |
| १३०० | ग) | महसुली अनुदाने, अंशदाने आणि अर्थसहाय्य | 1884321655.00 | 1058996000.00 |
| १४०० | घ) | महानगरपालिका मालमत्तेपासून भाडयाचे उत्पन्न | 26205700.00 | 39271000.00 |
| १५०० | ड) | फी वापरकर्ता आकार आणि द्गव्यदंड यापासून मिळणारे उत्पन्न | 133329230.00 | 93829500.00 |
| १६०० | च) | विक्री व भाडे आकार यापासून उत्पन्न | 2213000.00 | 2211000.00 |
| १७०० | छ) | व्याजापासूनचे उत्पन्न | 130029999.60 | 45030000.00 |
| १८०० | ज) | समपध्दत ठेवी / ना-परतावा ठेवी इत्यादी | 1000.00 | 1000.00 |
| १९०० | झ) | इतर उत्पन्न | 201818000.00 | 111318000.00 |
| | | एकूण महसुली जमा | **2735438584.60** | **1716517500.00** |
| ३२०० | क) | विशिष्ट प्रयोजनाकरिता सर्व अनुदाने, अंशदाने | 1437964000.00 | 1585898000.00 |
| ३३०० | ख) | सुरक्षित असुरक्षित कर्ज | 10000.00 | 10000.00 |
| ३६०० | ग) | प्राप्त ठेवी | 108560000.00 | 99520000.00 |
| ३९०० | घ) | इतर दायित्व | 310210000.00 | 160210000.00 |
| | | एकूण भांडवली जमा | 1856744000.00 | 1845638000.00 |
| | | एकूण जमा | **6526158372.65** | **5394159077.65** |

| लेखा सांकेतांक | बाबीचे नांव खर्चाचे | | सुधारीत अंदाजपत्रक सन २०२२-२३ | अंदाजपत्रक सन २०२३-२४ |
|---|---|---|---|---|
| २१०० | क) | आस्थापना खर्च | 1367681805.00 | 1248108007.00 |
| २२०० | ख) | प्रशासकीय खर्च | 234623833.00 | 261575000.00 |
| २३०० | ग) | व्याज व वित्त आकार | 3900000.00 | 3900000.00 |
| २४०० | घ) | मत्तांची दुरुस्ती व परिरक्षण | 126675000.00 | 155220000.00 |
| २५०० | त्र) | व्यवहाराकरिता आणि कार्यक्रम अंमलबजावणी करिता खरेदी | 161301557.00 | 240510000.00 |
| २७०० | च) | दिलेली महसुली अनुदाने, अंशदान व अर्थसहाय्य | 230125245.00 | 135014000.00 |
| २८०० | छ) | तरतुदी आणि निर्लेखित करणे | 16337000.00 | 15272000.00 |
| २९०० | ज) | राखीव निधी व संकीर्ण खर्च | 658494132.00 | 493910000.00 |
| | | एकूण महसुली खर्च | **2799138572.00** | **2553509007.00** |
| ४१०० | क) | स्थिर व जंगम मत्ता | 1675306223.00 | 2065498420.00 |
| ४७०० | ख) | कर्ज, अॅग्रीम, ठेवी | 19710000.00 | 22610000.00 |
| ४९०० | ज) | इतर मत्ता | 200000000.00 | 50000000.00 |
| | | एकूण भांडवली खर्च | 1895016223.00 | 2138108420.00 |
| | | अखेरची शिल्लक | 1832003577.65 | 702541650.65 |
| | | एकूण खर्च | **6526158372.65** | **5394159077.65** |

## <u>दृष्टिक्षेपात सन २०२२-२३ चे अंदाजपत्रक व केलेली कार्यवाही.</u>

1. सन २०२२-२३ या आर्थिक वर्षातील मिळकतधारकांना मिळकत कर भरणा करण्यासाठी प्रोत्साहन मिळावे म्हणून व मिळकत धारकास दंड व शास्ती लागू नये म्हणून मिळकतकरात दि.१५/८/२०२२ ते दि.१५/९/२०२२ अखेर ३%, दि.३०/९/२०२२ अखेर २% दि.३०/१०/२२ अखेर १% या प्रमाणे मिळकत करात सुट देण्यात आली.
2. एचडीएफसी बँकेच्या माध्यमातून असेंटेक कंपनीशी करार करून कर वसुलीसाठी नवीन संगणक प्रणाली अमलात आणण्यात आली. प्रभाग समिती कार्यालयात मिळकतधारकांना घरफाळा व पाणी पट्टी भरणा केंद्र सुरु करून नागरिकांची सोय करण्यात आली. तसेच नेट बँकिंग सुविधा उपलब्ध करून दिल्याने यावर्षी करांचा भरणा केलेल्या करदात्यांपैकी अंदाजे १० टक्के मिळकत धारकांनी नेट बँकिंगच्या माध्यमातून करांचा भरणा केला.
3. नागरिकांना पाणी पुरवठा पुरेशा प्रमाणात करणे कामी पंचगंगा जॅकवेल व कट्टीमोळ डोह येथे पंपींग मशिनरी उभारुन पाणी उपसा करून शहरास पाणी पुरवठा करणेत आला. तसेच जलशुध्दीकरण केंद्राकडील विविध चार झोनच्या पंपींग मशिनरी बदलून कार्यान्वित केल्या आहेत. त्यामुळे सदर झोन मधील नागरीकांना वेळेत पाणी पुरवठा करणे शक्य झाले आहे.
4. टाकवडेवेस येथील वारंवार नादुरुस्त होणाऱ्या पंपींग मशिनरी बदलणेत आल्या आहेत. त्यामुळे महानगरपालिकेमार्फत सांडपाण्यामुळे होणारे प्रदुषण काही अंशी कमी झाले आहे.
5. पंचगंगा प्रदुषणाबाबत UIDSSMT योजने अंतर्गत उर्वरित भुयारी गटर योजनेसाठी निविदा मागवून मक्तेदार यांचेमार्फत STP उभारणेचे काम सुरु आहे. त्यामुळे STP उभारलेनंतर महानगरपालिकेमार्फत निर्माण होणाऱ्या सांडपाण्यावर प्रक्रिया करुन पाणी प्रदुषण रोखण्यात येणार आहे.
6. सन २०२२-२३ मध्ये ज्या गाळ्यांची मुदत संपली आहे अशा मुदत संपलेल्या गाळ्यांची मुदत संपलेल्या तारखेपासून प्रथम २५% दराने सुधारित दर निश्चित करुन दर तीन वर्षाला वाढीव प्रमाणे गाळा भाडे निश्चित करणेत आले आहे. महानगरपालिका मालकीचे १५ गाळेंचा जाहिर ई-लिलाव करून भाडेतत्वार देणेत आलेले आहेत. तसेच शहरातील महानगरपालिका हद्दीतील सार्वजनिक रस्त्यावरील दैनंदिन बाजार व साप्ताहिक बाजार फी, स्टॉल फी इ. वार्षिक रक्कम रु.८५.४५ लाखाला मक्ता पध्दतीने १२ महिनेसाठी ठेका देणेत आला आहे.
7. महानगरपालिकेच्या इमारत देखभालीसाठी सुरक्षा मंडळाकडून सुरक्षारक्षकांची सेवा घेणेत आलेली आहे. तसेच जलतरण तलावाकडे जीवरक्षक सेवा घेणेत आलेली आहे.
8. मागील वर्षामध्ये महानगरपालिका अधिनियमाप्रमाणे वृक्षकर अनामत, भाग नकाशा, झोन दाखला शुल्क, शिथिलता मंजूर करावयाच्या प्रकरणी अनामत, मंजूरी न घेता बांधकाम सुरु केले असल्यास शुल्क आकारणी

फी, वापर दाखला न घेता जागेचा वापर सुरु करणेत आला असल्यास शुल्क आकारणी तसेच TDR हस्तांरण शुल्क आकरणी इत्यादी नविन उत्पन्नाचे स्त्रोत निर्माण केलेले आहेत.

9. सन २०२२-२३ च्या अर्थसंकल्पीय तरतुदीनुसार शहरातील प्रभागनिहाय रस्ते, गटर दुरुस्तीची कामे, शाळा, शौचालय दुरुस्तीची कामे, पुतळे व्यवस्थापन दुरुस्ती, महात्मा गांधी पुतळयाचे सुशोभिकरण व नगरपरिषद जूनी इमारत मधील कौन्सिल हॉल मधील पुतळयांची रंगरंगोटी इत्यादी कामे करणेत आलेली आहे. वरदविनायक अपार्टमेंट ते लिंबू चौक ते किसान चौक सायकल ट्रॅकची निर्मिती करणेत आलेली आहे. शहर सौदर्यीकरण अंतर्गत शहरातील पाण्याच्या टाक्या, दर्शनी असलेल्या भिंती व STP या ठिकाणी प्रबोधनात्मक चित्रे रंगविणेत आलेली आहेत. तसेच श्रीगणेशमुर्तीचे पर्यावरण पुरक विसर्जन व्हावे व पंचगंगा नदीचे प्रदुषण कमी व्हावे याकरिता महानगरपालिकेकडून शहरात चार ठिकाणी कृत्रिम तलावांची निर्मिती करुन गणेश विसर्जन करणेत आले. तसेच तलावातील तळात असलेल्या मुर्तीचे पुन्हा शास्त्रोक्त पध्दतीने विसर्जन करून तलाव भुजविणेत आलेले आहेत.
10. विधी विभागाकडून महानगरपालिकेसाठी वकीलांची नवीन पॅनलची नियुक्ती केलेली आहे.
11. विविध नैसर्गिक व मानव निर्मित आपत्तीच्या वेळी उदा. महापूर, आग लागणे, अतिवृष्टी, घर पडणे, धोकादायक झाडे काढणे इत्यांदी प्रसंगी शहरातील नागरीकांना मदत करणेसाठी महानगरपालिकेने आपत्ती व्यवस्थापन यंत्रणा उभी केली आहे. यामध्ये अनुभवी व प्रशिक्षीत कर्मचारी आहेत. तसेच महानगरपालिका शासनमान्य संस्थेकडील प्रशिक्षीत कर्मचाऱ्यांची व प्रशिक्षीत खाजगी रेस्क्यु टिमची मदत घेते. सद्यस्थितीत फायर फायटर ४, फायर बुलट २, रुग्णवाहीका २, शव वाहिका २, फायबर अऊट मोटर बोट १, रबर अऊट मोटर बोट २, एमर्जन्सी लॅम्प २, लाईफ जॉकेट ३०, लाईफ रिंग ६, दोरखंड ५०० मीटर, बायनाक्लोर ३, टेंट ४, हुड कटर १, स्टिल कटर १, पॉवर हॉन्ट टुलकिट १, स्टिक २, फायरींग पाईप, सक्शन पाईप, मल्टीप्रर्पज नोजल, फोम नोजल, हॉल्मेट ८, गमबुट ८, टॉर्च ६, मास्क २, स्मुक गॉगल ८, फायर एक्स ४, स्टेचर २, फायर सिलेंडर ३०, फायर बॅल २०, फायर ब्लँकेट , हॅन्ड ग्लोज, फायर सुट ७, बीएससी सेट २, स्लायडिंग लॅडर २, सेप्टी बेल्ट ४, इत्यादी साहित्य महानगरपालिकाकडे उपलब्ध आहे.
12. सन २०२२-२३ मध्ये आरोग्य विभागाने इचलकरंजी महानगरपालिकेच्या कचरा डेपो येथे ५०० KV चे विद्युत कनेक्शन मिळालेने घनकचऱ्यावर प्रक्रिया करणेसाठी उभारणेत आलेला प्रकल्प पुर्ण क्षमतेने सुरु झालेला आहे. कचरा डेपो येथील सुका कचऱ्यासाठी (Dry Waste) शेड बांधून पुर्ण झालेले आहे. कचरा डेपो येथील वजन काटा कार्यान्वित करणेत आला आहे. Wet Waste साठी Electric शेड बांधणेचे काम प्रगती पथावर आहे. कचरा डेपो येथील ५ TPD बायोमिथेनेशन ग्रॅस प्रकल्प कार्यान्वित करणेत आला आहे.
13. सन 2022-23 तत्कालीन इचलकरंजी नगरपरिषद कालावधीत थकीत सहायक अनुदान मिळणेबाबत शासन स्तरावर पाठपुरावा करणेत आला. राज्यातील नगरपरिषदांना थकीत सहायक अनुदान वितरीत करण्याबाबत नगरपरिषद प्रशासन संचालनालय शासनाने वितरित केलेल्या निधीपैकी थकीत सहायक अनुदानापोटी नगरपरिषदेस रक्कम रु.९८.०९ कोटी प्राप्त झाले. त्यामधून कार्यरत कर्मचारी, सेवानिवृत्त तसेच मयत कर्मचाऱ्यांचे थकीत असलेली सर्व देणी सन २०२२-२३ मध्ये अदा करणेत महानगरपालिकेला यश मिळाले. प्रलंबित कर्मचारी व शासकीय देणे थकीत सहायक अनुदानातुन अदा केलेमुळे म.न.प.निधीचा नियोजनबध्द वापर करुन इतर अशासकीय दायित्व कमी करणेत प्रशासनास यश आलेले आहे.
14. शहरातील सर्वसाधारण कुंटुंबातील विद्यार्थांना प्राथमिक शिक्षण देणे व इतर कार्य व कर्तव्य पार पाडण्यासाठी शिक्षण विभागामार्फत सन २०२२-२३ या आर्थिक वर्षासाठी २०% शिक्षणमंडळ अनुदान मधून रक्कम रु. १६ कोटी व म.न.पा शिक्षण मंडळ अनु. अपात्र अनुदान अंतर्गत रक्कम रु.३ कोटी इतक्या रक्कमेची तरतुद करुन सदरचा खर्च शैक्षणिक कार्ये व कर्तव्य पार पाडण्यासाठी करणेत आला आहे.
15. आर्थिकदृष्टया दुर्बल घटक कल्याणकारी खर्च, महिला व बाल कल्याण, दिव्यांग कल्याण कार्यक्रम तसेच इतर राष्ट्रीय कार्यक्रमांसाठी महसुल उत्पन्नातून शासनाने ठरवुन दिलेल्या नियमावलीप्रमाणे अंदाजपत्रकीय तरतुद करणेत आली होती.
16. महानगरपालिका स्थापनेनंतर प्रथमता एकूण ३३ संवर्गाचा ४२ पदांचा आकृतीबंध मंजूर करून माहे जुलै व ऑगस्ट २०२२ मध्ये कामकाजात सुसूत्रता आणली. नुकताच महानगरपालिकेचा १७४४ पदांचा आकृतीबंध शासनाने मंजूर केला असून नजीकच्या काळात पारदर्शक पद्धतीने काही पदांसाठी भरती प्रक्रिया राबवली जाणार आहे. सफाई कर्मचाऱ्यांच्या वारसांना प्राधान्याने नेमणूका देणे, प्रलंबित अनुकंपा नियुक्त्यांसाठी शासन दरबारी पाठपुरावा करणे व सेवेतील कर्मचाऱ्यांचे कामकाजात गुणात्मक प्रगती होण्यासाठी प्रशिक्षण आयोजित करणे इत्यादी कार्यवाही सुरू आहे.

17. महानगरपालिका स्थापनेनंतर इचलकरंजी शहर हद्दीतील विद्यार्थ्यांसाठी शहर जिल्हा गृहीत धरला जात असल्याने महानगरपालिका शहर जिल्हास्तरावरील सर्व क्रीडा स्पर्धा आयोजित करण्यात आल्या. याकामी नियुक्त प्रभारी क्रीडा अधिकारी व पर्यवेक्षक यांनी उल्लेखनीय कामगिरी केल्यामुळे राज्य पातळीवरही काही संघ पाठविणेत आले.
18. कोरोना काळानंतर शैक्षणिक संस्थांनी विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेवर भर देणे व सर्व शैक्षणिक व सांस्कृतिक उपक्रम सुरू करणे यावर्षी क्रमाप्राप्त होते. त्यामुळे महानगरपालिकेचे शाहू विद्यालय व सर्व प्राथमिक शाळांमध्ये शैक्षणिक व सांस्कृतिक कार्यक्रम समयबद्ध रीतीने घेण्यात आले. शालेय गणवेश व साहित्य वाटप वेळेत करून शहरवासीयांसाठी सुयोग्य सुविधा दिल्यामुळे महानगरपालिकेच्या शाळेमध्ये पटसंखेत वाढ होऊ लागली आहे.
19. महानगरपालिका कर्मचाऱ्यांमध्ये शिस्त रूढ करण्यासाठी तपासणी व भरारी पथकाची नियुक्ती बायोमेट्रिक अटेंडन्स सक्तीचे करणे, गैरहजर व गैरवर्तणूक करणाऱ्या कर्मचाऱ्यांवर कारवाई करणे तसेच महानगरपालिका कार्यालय गुटखा व तंबाखू मुक्त करणे इत्यादी उपक्रम राबविल्यामुळे नागरी सुविधा वेळेत पुरविण्यासाठी यश येत असून महानगरपालिकेची प्रतिमाही जनमानसात उंचावली जात आहे.
20. आर्थिक अडचणींना महानगरपालिका सामोरे जात असताना अतिवृष्टी व पूर परिस्थितीमुळे रस्त्यांची झालेली दुरावस्था दूर करण्यासाठी योजना राबवून शहरातील रस्त्यांची दुरुस्ती करण्यात आली.
21. कृष्णा नदीवरील पाणीपुरवठा योजना सुरळीत करण्यासाठी यापूर्वी मंजूर कामे या वर्षा अखेर पूर्ण करण्याचा संकल्प असून उर्वरित सहा किलोमीटर लांबीची मुख्य जलवाहिनी बदलण्याचा प्रस्ताव शासनाकडे मंजुरीसाठी अंतिम टप्प्यात आहे. शासन मंजुरीनंतर सत्वर कार्यवाही प्राधान्याने केली जाणार आहे.
22. अनेक वर्षापासून शहरात उद्भवलेल्या पाणी टंचाई विषयाचे गांभीर्य व प्राधान्यक्रम विचारात घेऊन अमृत २.० अभियानांतर्गत रुपये १६० कोटी इतक्या किंमतीची दूधगंगा नदीवरून सुळकुड पाणीपुरवठा योजना शासनाने मंजूर केली आहे. निविदा प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर सदरची योजना अंमलात आणली जाईल.
23. नगररचना विभागाचे बहुतांशी काम ऑनलाइन सुरू केले असून ऑनलाईन बांधकाम परवानगी देणे, काम पूर्णत्वाचा दाखला देणे, उपविभागणी इत्यादी कामे कमी वेळेत होत आहेत.
24. सन 2005 नंतर महानगरपालिका सेवेत रुजू झालेल्या कर्मचाऱ्यांना अंशदान निवृत्ती वेतन योजना लागू झालेली आहे. तथापि कर्मचाऱ्यांचे लेखी विवरण पत्र अद्यावत करणे व योजनेनुसार सर्व लाभ देणे यासाठी आज अखेर आवश्यक त्या उपाययोजना करण्यात आलेल्या नव्हत्या. त्यामुळे राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजनेमध्ये महानगरपालिकेच्या कर्मचाऱ्यांचा समावेश करण्यासाठी व कर्मचाऱ्यांचे खात्यावर जमा रकमांचा ताळमेळ घालण्यासाठी प्राधान्याने कार्यवाही केली जात आहे.
25. शासकीय योजनांमधून प्राप्त निधी पैकी अखर्चित निधी खर्च करण्यास प्राधान्य दिले जात असून भविष्यात आणखी प्रकल्प राबविण्यासाठी शासनाकडे अनेक प्रकल्प सादर करण्यात आलेले आहेत.
26. अनेक वर्ष प्रलंबित न्यायभवनाच्या विकासाच्या जागेच्या प्रश्नाबाबत शासनाच्या निर्देशानुसार गौण फेरबदलाची कार्यवाही सुरू करण्यात आली असून लवकरच शासनाकडे पुनश्च प्रस्ताव सादर करण्यात येणार आहे.
27. महानगरपालिका अधिनियमातील तरतुदीप्रमाणे बांधील खर्च वजा जाता खालील बाबींवर विहीत रक्कमेची तरतुद करणेत आलेली आहे.

| अ.क्र. | लेखाशिर्ष | सन २०२२-२३ तरतुद |
|---|---|---|
| १ | महिला बालकल्याण निधी | ४१ लाख |
| २ | आर्थिकदृष्टया दुर्बल घटक कल्याणकारी खर्च | ४१ लाख |
| ३ | दिव्यांग कल्याण कार्यक्रम | ४१ लाख |

## महानगरपालिकेसमोरील भविष्यातील आव्हाने

1. सन 2023-24 मध्ये विशेष वसुली पथकाची नेमणूक करुन 100% घरफाळा वसुली करणेच्या दृष्टीने प्रयत्न करणे. याकामी ऑनलाईन सुविधा अंतर्गत QR Code, गुगले पे, फोन पे, UPI इत्यादी पेमेंट सुविधा नागरिकांना उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे. त्याच्या प्रचार व प्रसारासाठी कार्यवाही करणे
2. मिळकत धारकांना दैनंदिन शुध्द पाण्याचा पुरवठा करणेकामी वारंवार होणारी गळती रोखणे. याकामी नगरोत्थान योजने अंतर्गत दाबनलिका बदलून नविन पाईप लाईनचे काम पुर्णत्वास घेऊन जाणे. तसेच पंचगंगा नदी प्रदुषण रोखणेसाठी UIDSSMT योजनेतून उर्वरित भुयारी गटर योजनेचे काम सुरु करुन STP उभारणेत येणार आहे. तसेच औद्योगिक क्षेत्रातील केमिकल युक्त पाण्यावर प्रक्रिया करणेसाठी आवश्यक क्षमतेचा CETP प्रकल्प बळकटीकरण करणे व नव्याने औद्योगिक सांडपाणी प्रक्रिया केंद्र उभारणेकामी संबंधित संस्थेस व उद्योजकांना भाग पाडणे.
3. महानगरपालिकेच्या भाडेपट्ट्याने द्यावयाच्या मालमत्ता ई-लिलाव करुन भाडे तत्वावर देऊन उत्पन्नात वाढ करणे. तसेच आवश्यक त्या ठिकाणी मालमत्तेची डागडूजी करवून घेणे.

4. तत्कालीन नगरपरिषद कालावधीत संपादन केलेल्या खाजगी जागांचे दायित्व अदा करुन प्रलंबित असलेली न्यायालयीन प्रकरणे निकाली काढणे.
5. केंद्र व राज्य शासनाकडे सादर केलेली GST अनुदान प्रस्ताव, थकीत सहायक अनुदान प्रस्ताव त्याचबरोबर १५ वा वित्त आयोग, महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान, लो.शा.आ.भा.सा.नागरी दलित वस्ती सुधारणा योजना, अग्निशमन योजना, नागरी दलित्तेतर वस्ती सुधारणा योजना, नैसर्गिक आपत्ती व्यवस्थापन, सर्वसाधारण रस्ता अनुदान, ठक्करबाप्पा अदिवासी वस्ती सुधारणा योजना, पंतप्रधान आवास योजना, अमृत अभियान योजना, स्वच्छ महाराष्ट्र अभियान योजना, खासदार, आमदार स्थानिक विकास कार्यक्रम, नाविन्यपुर्ण योजना, जैव विविधता व्यवस्थापन अनुदान, तिर्थक्षेत्र विकास योजना अशा विविध प्रकारच्या योजनामधून महानगरपालिकेस निधी उपलबध करून घेणे.
6. महानगरपालिका क्षेत्रात सर्वसाधारण 22 झोपडपट्टी अस्तित्वात असून त्यापैकी 9 झोपडपट्ट्या मोठया स्वरुपाच्या आहेत. शहरातील झोपडपट्टींचे पुर्नवसन करणेच्या दृष्टीने शासन स्तरावरुन IHSDP योजनेतून तसेच शासनाच्या अन्य योजनेतून निधी उपलब्ध करुन शहरातील झोपडपट्टींचे पुर्नवसन करणे व इचलकरंजी शहर झोपडपट्टी मुक्त करणे.
7. शहरातील महापुर बाधित रेड झोन परिसरातील लोकांना सुरक्षित स्थळी स्थलांतरित होण्यासाठी प्रवृत्त करणे. तसेच शहराच्या पंचगंगा नदी पात्र परिसरामध्ये कायम स्वरुपी महापुर रोखणेसाठी कोल्हापूर शहराच्या धर्तीवर इचलकरंजी शहराकरिता शासन स्तरावरुन प्लॅन तयार करुन शासनाकडून योजना मंजूर करुन घेणे.

## <u>सन २०२३-२४ मधील नियोजन व संकल्प</u>

1. सन २०२३-२४ मजरेवाडी जॅकवेल कडून येणारी अशुध्द पाण्याची दाबनलिका कुरुंदवाढ ते शिरढोण या दरम्यान वारंवार गळती होत असलेने सदर दाबनलिका शासनाच्या नगरोत्थान योजने अंतर्गत बदलून घेऊन नदी पात्रातून पाईप लाईन टाकून सुरु करून घेणेत आले आहे. तसेच मिळकत धारकांचे नळ कनेक्शनला जलमापक यंत्र बसवून त्यानुसार टेलिस्कोपीक दराने पाणी बिल आकारणेबाबत कार्यवाही करणेत येणार आहे. याकरीता मे.शासनाचे अमृत २.० संकेतस्थळावर सविस्तर प्रकल्प अहवाल सादर केला आहे. नगर विकास विभाग शासन निर्णय क्रमांक अमृत-२०२२/प्र.क्र.२६८/नवि-३३ दि.२ नोव्हेबर,२०२२ नुसार केंद्र शासन पुरस्कृत अमृत २.० अभियान अंतर्गत इचलकरंजी महानगरपालिकेच्या पाणी पुरवठा प्रकल्पास रु.१६०.८४ कोटी रक्कमेची प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली असून सदर प्रकल्प पुर्ण होताच शहरातील नागरिकांना पुरेशा प्रमाणात पाणी पुरवठा होणार आहे.
2. सन २०२३-२०२४ या आर्थिक वर्षात उत्पन्न वाढ करण्याच्या दुष्टीने नविन मिळकती, रिकामा प्लॉट, इमारत वापरात होणारे बदल या इमारतीवर नविन दराने आकारणी करणे कामी सुधारित दर मंजूर करुन मलप्रवाह लाभ सुविधा करामध्ये २%, पाणी पुरवठा लाभ करामध्ये २% व पथकर मध्ये १% या करांचा एकत्रित मालमत्ता करात समावेश करण्यात आलेला आहे. तसेच विशेष स्वच्छता कर मध्ये प्रति स्वच्छतागृह रु.१०० प्रमाणे वाढ करणेत आली आहे.
3. महाराष्ट्र आग प्रतिबंधक-२०१५ मधील तरतुदीनुसार Fire Infrastructure Charges ची नव्याने आकारणी करणे व एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली-२०२० नुसार बांधकाम परवानगी मंजूर करताना प्रिमियम FSI व TDR वापराचा प्राध्यान्यक्रम ठरविणेत आलेला आहे. त्यामुळे महानगरपालिका उत्पन्नात वाढ होणार आहे. तसेच TDR च्या बदल्यात आरक्षित जमिनी संपादित करण्यासाठी मदत होणार आहे.
4. सन २०२३-२४ करिता शहर विकासाचे नियोजनासाठी सर्वसाधारण जिल्हा वार्षिक योजना अंतर्गत महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियांन (जिल्हास्तर) अंतर्गत एकुण १०० कामांचा रक्कम रु.२६.६७ कोटीचा प्रस्ताव व लोकशाहीर आण्णा भाऊ साठे नागरी दलित वस्ती सुधारणा योजना अंतर्गत एकण १३ कामांचा रक्कम रु.७.७० कोटीचा प्रस्ताव जिल्हा नियोजन समितीकडे सादर करणेत येत आहे. पर्यावरण पुरक दृष्टीने भविष्यामध्ये पंचगंगा नदीचे प्रदुषण न होणेच्या अनुषंगाने नदीच्या परिसरात गणेश विसर्जनासाठी कायमस्वरुपी कृत्रिम तलावाची निर्मिती प्रस्तावित आहे. महानगरपालिका प्रशासकीय इमारत दुसरा मजला सभागृहासाठी इंटेरिअरचे काम प्रस्तावित, श्री शिवतीर्थ विकसित करणे व सुशोभिकरण करणे कामाचा दुसरा टप्पा प्रस्तावित, तसेच बाजाराच्या गर्दीच्या ठिकाणी महिलांसाठी स्वतंत्र स्वच्छतागृहाची निर्मिती प्रस्तावित आहे.

5. सन २०२३-२४ या आर्थिक वर्षासाठी शैक्षणिक कार्यासाठी 3 कोटी रक्कमेची तरतुद केलेली आहे. रा.छ.शाहू हायस्कुल येथे आर्थिक दुर्बल घटक शिष्यवृत्ती स्पर्धा परिक्षा योजनेकरिता बाहययंत्रणे अंतर्गत शिक्षक भरती करुन त्याचा लाभ विद्यार्थ्यांना होणार आहे.

## शहरवासियांकडून अपेक्षा

1. शहरवासियांनी आपला घरफाळा व पाणीपट्टी वेळेत भरुन महानगरपालिकेस सहकार्य करावे. तसेच महानगरपालिकेच्या रिबेटचा लाभ घ्यावा.
2. सर्व भाडेधारक, गाळाधारक यांनी ज्या त्या वेळी भाडे देऊन महानगरपालिकेस सहकार्य करावे.
3. शहर वासियांनी ओला कचरा व सुका कचरा वर्गीकरण करुन नियमित घंटागाडीमध्ये टाकून शहर परिसर स्वच्छ ठेवणेसाठी प्रयत्न करावे. नागरिकांनी आपआपल्या भागात कचरा रस्त्यावर टाकला जाणार नाही याची काळजी घ्यावी.
4. नागरिकांनी पाण्याचा वापर काटकसरीने करावा. सार्वजनिक बोअरच्या ठिकाणी पाणी वाया जाणार नाही याबाबत काळजी घ्यावी.
5. औद्योगिक क्षेत्राशी निगडीत व्यापारी यांनी केमिकल युक्त पाणी नदीपात्रात सोडले जाणार नाही याची काळजी घ्यावी. याकामी आवश्यक त्या नियमावलीचे व्यापारी वर्गाकडून पालन करणेत यावे.
6. शहरातील सार्वजनिक ठिकाणी स्वच्छता राखणेची दक्षता घेणेत यावी.
7. शहरवासियांनी स्वताचे मिळकतीमध्ये वृक्ष लागवड करणेचा प्रयत्न करावा.
8. मिळकतधारकांनी आपल्या परिसरामध्ये रेन वॉटर हार्वेस्टींग प्रकल्प करुन पाणी स्त्रोतामध्ये वाढ करणेचा प्रयत्न करावा. व घरफाळयामध्ये 10% सुट योजनेचा लाभ घ्यावा.
9. वाहतुकीचे नियम पाळणेत यावे.
10. ज्याप्रमाणे महानगरपालिका कार्यालय परिसर गुटखा व तंबाखूमुक्त केला आहे. त्याचप्रमाणे संपूर्ण शहर गुटखा व तंबाखू मुक्त होईल व शहरातील नागरिक कॅन्सर पासून दूर राहतील त्यासाठी ही लोक चळवळ व्हावी.
11. ऐतहासिक वास्तु जतन करणेकामी सामाजिक संस्था यांनी पुढाकार घेऊन महानगरपालिकेस सहकार्य करावे.

## आभार व समारोप

इचलकरंजी शहरवासियांना जास्तीत जास्त सेवा व सुविधा पुरविण्याकरिता शासन स्तरावरुन आवश्यक निधी उपलब्ध करणेच्या दृष्टीने सर्व सन्माननिय सदस्य यांनी प्रयत्न करणे आवश्यक राहणार आहे. तसेच महानगरपालिकेचे उत्पन्न वाढीच्या दृष्टीने सर्व सदस्यांनी सहकार्य करावे. सन 2023-24 सालाच्या अंदाजपत्रकामधील योजना, संकल्प पुर्तीसाठी शहरातील नागरीक व सन्माननिय लोक प्रतिनिधी यांचेकडून सहकार्य लाभेल अशी अपेक्षा बाळगतो व माझे निवेदन संपवितो.

**जय हिंद ! जय महाराष्ट्र !**

**सुधाकर विष्णू देशमुख**
**आयुक्त तथा प्रशासक**
**इचलकरंजी महानगरपालिका**